# पंख संस्था, क्रिकहिल फाउंडेशनतर्फे सामाजिक विषयांवर पथनाट्य सादर

**पिंपरी –** पंख संस्था, क्रिकहिल फाउंडेशन व पिंपरी–चिंचवड आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी येथील शगुन चौकात पथनाट्य सादर करण्यात आले. आकार नाट्यसंस्थेच्या कलाकारांनी सोशलमीडिया, बलात्कार, शेतकरी आत्महत्या, देशप्रेम अशांसारख्या ऐरणीवर असलेल्या प्रश्नांना वाचा फोडणारे अत्यंत बोलके व काळजात भिडणारे असे पथनाट्य सादर केले. या स्वरुपाच्या गंभीर समस्यांवर समाज प्रबोधन होणे ही काळाची गरज आहे; त्यामुळे या गोष्टीचा गंभीर विचार करून पुढील काही दिवसात पंख संस्था पोलिसांच्या सहकार्याने पुणे परिसरात हा उपक्रम राबविणार आहे. कार्यक्रमासाठी पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, विश्वस्त कल्याणी भाबड, जीवनमूल्य प्रशिक्षण प्रकल्प समन्वयक मैथिली बंडी, मिना चितळे तसेच पोलीस निरीक्षक निमगिरे व इतर पोलीस वर्ग आदी उपस्थित होते. स्मिता आपटे, पंख समुपदेशक सचिन करंजुले व ज्योती काटीकर यांनी संयोजन केले.

प्रभात Sat, 23 February 2019
epaper.eprabhat.net/c/37066243